सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एकात्मिक आरोग्य डॅशबोर्डच्या (Integrated Health Dashboard) आधारे जिल्हा व महानगरपालिका स्तरावर नियमित आढावा, सनियंत्रण व अनुपालन कार्यपद्धती कार्यान्वित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२६/ई.ऑ.क्र. १७६५१७४ /ई-गव्हर्नन्स

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक : ०१ सप्टेंबर, २०२६.

प्रस्तावना :

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचे कामकाज सुयोग्यरित्या पार पाडण्यासाठी माहितीवर आधारित आढावा व सनियंत्रण पद्धती अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. यासाठी विभागातर्फे विविध संगणक संकेतस्थळ जसे आरसीएच (RCH Portal), निक्षय (Nikshay), असंसर्गजन्य आजार (NCD Portal) यांसारख्या विद्यमान कार्यक्रम प्रणालींमधील माहिती एकत्रित करून आरोग्य सेवेचा एकसंध चित्र देणारा एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड (Integrated Health Dashboard) विकसित करून कार्यान्वित करण्यात आला आहे.

राज्यातील ३६ जिल्हे व २९ महानगरपालिका क्षेत्रांमध्ये होणाऱ्या आरोग्य विषयक बाबींच्या नियतकालिक कामगिरी आढाव्यासाठी सदर डॅशबोर्ड हा एकमेव संदर्भबिंदू म्हणून वापरल्यास या डॅशबोर्डद्वारे उपलब्ध होणाऱ्या माहितीचा वापर जिल्हा व महानगरपालिका स्तरावरील नियमित आढावा, संनियंत्रण, अनुपालन इ. करीता उपयुक्त ठरेल. त्यानुसार जिल्हा व महानगरपालिका स्तरावरील आरोग्य विषयक नियमित आढावा, संनियंत्रण, अनुपालन इ. कार्यपद्धती व दिनदर्शिका विहित करून ती संस्थात्मक स्वरूपात राबविल्यास राज्यातील आरोग्य विषयक बाबींच्या अनुषंगाने प्रगती करण्यास विभागास मदत होईल. त्यानुषंगाने विभागाने तयार केलेल्या डॅशबोर्डवरील माहितीच्या आधारे क्षेत्रीय स्तरावर आढावा घेण्यासाठी तसेच त्याआधारे कार्यक्षेत्रातील आरोग्य विषयक बाबींमध्ये सुधारणा करण्यासाठी डॅशबोर्डवरील माहितीच्या वापराची कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सार्वजनिक आरोग्य विभागाने विकसित केलेला एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड (Integrated Health Dashboard) राज्यातील सर्व ३६ जिल्हे व २९ महानगरपालिका क्षेत्रांतील सार्वजनिक आरोग्य कार्यक्रमांच्या नियतकालिक आढाव्यासाठी एकमेव संदर्भबिंदू म्हणून वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर डॅशबोर्ड https://dashboard.mhtm.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

२. एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड मार्फत राज्य आणि जिल्हयातील संबंधित अधिकारी यांनी सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमुद केल्यानुसार त्यांच्या अधिकार क्षेत्रातील आरोग्यविषयक स्थितीचा नियमित आढावा घ्यावा.

३. सर्व जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्या संबधित क्षेत्रातील एकात्मिक आरोग्य डॅशबोर्डच्या आधारावर आरोग्यविषयक बाबींच्या आढावा बैठका घ्याव्यात आणि त्या आढ़ाव्याच्या आधारावर त्यांच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे आरोग्य सुधारणेच्या दृष्टिने आवश्यक ती पाऊले उचलावीत.

४. एकात्मिक आरोग्य डॅशबोर्ड संबंधीचे तांत्रिक कामकाज हाताळण्यासाठी अवर सचिव / कक्ष अधिकारी (ई - गव्हर्नन्स), सार्वजनिक आरोग्य विभाग यांना नोडल अधिकारी म्हणून नेमण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०९०११३०८०५४३१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHANDRAKANT ARUN VIBHUTE

Digitally signed by CHANDRAKANT ARUN VIBHUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=D772C1C0413F707CB062D972B2618CF3943831624F050BADD4BD9AEA24219790, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B37242131913CE4AD7FFA0CAA314C8163271F8AF6410B5DFF1FC5B4C3CC19B76, cn=CHANDRAKANT ARUN VIBHUTE
Date: 2026.09.01 18:36:53 +05'30'

(चंद्रकांत विभुते)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुंबई
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव, मुंबई
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे प्रधान सचिव, मुंबई
५. मा. मंत्री (सा.आ.कु.क) यांचे खाजगी सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री (सा.आ.कु.क) यांचे खाजगी सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव सर्व विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
११. आयुक्त, शहरी आरोग्य, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
१२. सर्व विभागीय आयुक्त.
१३. सर्व जिल्हाधिकारी.
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१५. सर्व महानगरपालिका आयुक्त.
१६. उपसंचालक परिमंडळ (सर्व)
१७. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी.

१८. सर्व जिल्हा शल्यचिकित्सक.
१९. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (सर्व).
२०. सर्व जिल्हा आरसीएच अधिकारी (DRCHO).
२१. सर्व जिल्हा क्षयरोग अधिकारी (DTO).
२२. सर्व अपर जिल्हा आरोग्य अधिकारी (ADHO).
२३. सर्व सहाय्यक शल्यचिकित्सक (ACS).
२४. सह सचिव (सर्व), उपसचिव (सर्व), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५. निवडनस्ती.

शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२६/ई.ऑ.क्र. १७६५१७४ /ई-गव्हर्नन्स, दिनांक - ०१ सप्टेंबर, २०२६

परिशिष्ट

एकात्मिक आरोग्य डॅशबोर्डच्या आधारावर घ्यावयाचा आढावा व सनियंत्रण कार्यपद्धती आणि अनुपालन दिनदर्शिका

अ. क्र.	डॅशबोर्डच्या अनुषंगाने आढावा घेणारे अधिकारी	आढाव्याचा कालावधी	आढाव्याकरीता सहभागी होणारे अधिकारी	आढाव्याकरिता कार्यसूची
१	अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव	त्रैमासिक / गरजेनुसार	आयुक्त, आरोग्य सेवा, संचालक (रुग्णालय व प्राथमिक), सर्व उपसचिव, सर्व जिल्हाधिकारी, सर्व महानगरपालिका आयुक्त, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद	द्विमासिक/मासिक आढाव्यानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत.
२	आयुक्त, आरोग्य सेवा	दर २ महिन्यांनी/ गरजेनुसार	संचालक (रुग्णालय व प्राथमिक), सहसंचालक /उपसंचालक (सर्व), उपसंचालक (परिमंडळ सर्व)	पंधरा दिवसांच्या आढाव्यानुसार आणि मासिक आढाव्यानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत.
३	संचालक आरोग्य सेवा, (रुग्णालय) मुंबई व संचालक, आरोग्य सेवा (प्राथमिक) पुणे	दरमहा	सर्व संबधित कार्यक्रम प्रमुख	पंधरा दिवसांच्या आढाव्यानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत.
४	सर्व कार्यक्रम प्रमुख	दर पंधरा दिवसांनी	कार्यक्रमाशी निगडीत जिल्ह्यातील सर्व संबधित अधिकारी	१. माहितीची पूर्णता व तफावतीचा आढावा. २. कार्यक्रम, तालुका व आरोग्य संस्थानिहाय कामगिरीचा आढावा. ३. कमी कामगिरी करणारे घटक व धोक्याचे मुद्दे यांची निश्चिती. ४. मागील कृती आढावा. ५. स्थानिक पातळीवर निराकरण अथवा संक्षिप्त टिपणीसह वरिष्ठ स्तरावर सूचित करणे.
५	अ) जिल्हाधिकारी आ) महानगरपालिका, आयुक्त	दरमहा	अ) जिल्हा शल्यचिकित्सक आ) वैद्यकीय आरोग्य अधिकारी	१. प्रमुख निर्देशकांवरील एकंदर कामगिरी व कल यांचा आढावा.

अ. क्र.	डॅशबोर्डच्या अनुषंगाने आढावा घेणारे अधिकारी	आढाव्याचा कालावधी	आढाव्याकरीता सहभागी होणारे अधिकारी	आढाव्याकरिता कार्यसूची
	इ) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद		(महानगरपालिका) इ) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा कार्यक्रम प्रमुख, तालुका आरोग्य अधिकारी	२. कमी कामगिरी असणारे तालुके/आरोग्य संस्था व प्राधान्याचे धोक्याचे मुद्दे यांचा आढावा. ३. आंतर-कार्यक्रम व आंतर-विभागीय अडथळ्यांचे निराकरण. ४. मागील महिन्यातील निर्णय व केलेल्या कार्यवाहीबाबत सद्यस्थितीचा आढावा.
६.	उपसंचालक आरोग्य सेवा (परिमंडळ)	दरमहा	परिमंडाळांतील सर्व संबधित जिल्ह्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक	१. प्रमुख निर्देशकांवरील एकंदर कामगिरी व कल यांचा आढावा. २. कमी कामगिरी असणारे जिल्हे /आरोग्य संस्था व प्राधान्याचे धोक्याचे मुद्दे यांचा आढावा. ३. आंतर-कार्यक्रम व आंतर-विभागीय अडथळ्यांचे निराकरण.
७.	अ) जिल्हा आरोग्य अधिकारी आ) जिल्हा शल्यचिकित्सक इ) वैद्यकीय आरोग्य अधिकारी (महानगरपालिका)	दरमहा	संस्थापातळीवरील त्यांच्याशी संबधित आरोग्य संस्था प्रमुख	१. प्रमुख निर्देशकांवरील एकंदर कामगिरी व कल यांचा आढावा. २. आरोग्य संस्था व प्राधान्याचे धोक्याचे मुद्दे यांचा आढावा.

<u>टीप :-</u>

१. आढाव्याच्या तारखा स्थानिक पातळीवर विहित वारंवारता कायम राखून निश्चित करता येतील.

२. प्रत्येक आढावा बैठकीच्या इतिवृत्तात चर्चिलेला मुद्दा, निर्णय/कृती, जबाबदार अधिकारी व कालमर्यादा स्पष्टपणे नमूद असावी.

३. सदर डॅशबोर्ड हा आढाव्याचा प्रमुख माहिती स्रोत राहील; विहित कार्यक्रमनिहाय सांख्यिकीय अहवाल सादरीकरण स्वतंत्रपणे यथावत सुरू राहील.